प्रेसनोट दिनांक १९/०८/२०२५

" लोकसेविका १) श्रीमती ममता मनोज पिंपळे, पद – ग्राम विकास अधिकारी, सायवन, ता.डहाणु, जि.पालघर, २) विष्णु जीवन बोसरा, पद – सरपंच, सायवन, ता.डहाणु जि.पालघर ३) यशवंत किरण भोये, लिपिक (कंत्राटी कामगार) ग्रामपंचायत सायवन ता. डहाणु जि.पालघर **यांचेविरुध्द लाचेच्या सापळा कारवाईबाबत** "

| | | |
|---|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | :– | ठाणे |
| **तक्रारदार** | :– | पुरुष, वय– ३४ वर्षे |
| **लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | :– | १) श्रीमती ममता मनोज पिंपळे, पद – ग्राम विकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत सायवन,<br>२) श्री विष्णु जीवन बोरसा, सरपंच ग्रामपंचायत सायवन ता. डहाणु, जि. पालघर<br>३) श्री.यशवंत किरण भोये, वय.३५ वर्षे, पद – लिपीक (कंत्राटी) ग्रामपंचायत सायवन |
| **तक्रार प्राप्त दिनांक** | :– | दि. १३/०८/२०२५ |
| **मागितलेली लाचेची रक्कम** | :– | दि. १३/०८/२०२५ व दिनांक १८/०८/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणीमध्ये तडजोडीअंती १०,०००/– रुपये लाचेची मागणी व स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न |
| **स्विकारली लाचेची रक्कम** | :– | दि. १९/०८/२०२५ रोजी १०,०००/– रुपये आलोसे क्र. ३ यांने स्वीकारले. |
| **थोडक्यात हकीकत** | :– | यातील तक्रारदार यांचा स्थानिक शेतकऱ्यांकडुन गवताच्या पेंढया ( ओल्या व सुक्या गवताच्या ) विकत घेवून तो माल त्याच परिसरातील गोठा, तबेले व इतर पेपर कंपन्यांना विक्री करायचा व्यवसाय असुन, सदर व्यवसाय करण्याकरीता ग्रुप ग्रामपंचायत सायवन यांचेकडुन ग्रामसभेचे ना **हरकत प्रमाणपत्र** देण्याकरीता लोकसेविका **श्रीमती ममता मनोज पिंपळे,** पद – ग्राम विकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत सायवन, ता.डहाणु, जि. पालघर **व इतर लोकसेवक श्री विष्णु जीवन बोरसा, सरपंच ग्रामपंचायत सायवन ता. डहाणु, जि. पालघर** यांनी ग्रामसभेचे ना **हरकत प्रमाणपत्र** देण्याकरीता १०,०००/–रु लाचेची मागणी करीत असल्याबाबत यातील तक्रारदार यांनी दिनांक १३/०८/२०२५ रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथे लेखी तक्रार दिलेली आहे.<br>सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि. १३/०८/२०२५ व दिनांक १८/०८/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणीमध्ये **लोकसेविका श्रीमती ममता मनोज पिंपळे व इतर लोकसेवक श्री विष्णु जीवन बोरसा,** सरपंच यांनी तक्रारदार यांचेकडे ग्रामसभेचे **ना हरकत प्रमाणपत्र** देण्याकरीता १०,०००/–रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्याप्रमाणे दिनांक १९/०८/२०२५ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेविका **श्रीमती ममता मनोज पिंपळे** यांचे सांगणेवरुन कंत्राटी कामगार यशवंत किरण भोये, लिपीक याने तक्रारदार यांचेकडून १०,०००/– रुपये रोख लाचेची रक्कम स्वीकार करुन शासन प्रमाणित अधिकृत नसलेल्या एका पावती पुस्तकातील सीरियल नंबरने न देताच मध्येच दोन पावत्या फाडून त्यातील एक १८,०००/– रुपयांची कर पावती (सही न केलेली) व दुसरी १०,०००/– रुपयांची देणगी पावती लिपीक यांचे सहीने तक्रारदार यांना दिली. त्यावेळी त्यांना पकडण्यात आले असुन लोकसेविका **श्रीमती ममता मनोज पिंपळे,** पद – ग्राम विकास अधिकारी, **इतर लोकसेवक श्री विष्णु जीवन बोरसा, सरपंच तसेच** श्री.यशवंत किरण भोये, पद – लिपीक (कंत्राटी कामगार) यांना ताब्यात घेण्यात आले असुन नमुद लोकसेवक यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे |

**मार्गदर्शन अधिकारी** – १. मा. श्री. शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे
२. मा. श्री. संजय गोवीलकर, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.
३. मा. श्री. सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परीक्षेत्र यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता – लाप्रवि ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१
संकेत स्थळ– acbmaharastra@mahapolice.gov.in, Email – spacbthane@ mahapolice.gov.in
अॅप्लीकेशन – acbmaharastra.net
टोल फ्रि नंबर– १०६४
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटस्अॅप्स् क्रमांक – ९९३०९९७७००

( प्रमोद आहिरे )
पोलीस निरीक्षक,
अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

पोलीस निरीक्षक

Scanned with OKEN Scanner